राज्यशास्त्र विभाग

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध उपक्रम आयोजित केले. त्याबाबतचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे

नव युवा मतदार नोंदणी अभियान

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाविद्यालयात विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत दि. २/८/२०२४ रोजी नव युवा मतदार नोंदणी अभियान घेण्यात आले. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून मा. सचिन वाघ (नायब तहसीलदार, आंबेगाव) मा. श्री. गावडे, अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस. गायकवाड आदी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना मा. सचिन वाघ म्हणाले, मतदार यादीत नाव नोंदविण्याकरीता वोटर हेल्पलाइन या ॲप किंवा https://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करता येईल. नजीकच्या मतदार नोंदणी कार्यालयात ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करता येईल. त्यामुळे आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करता यावे याकरिता नव मतदारांनी ९ ऑगस्टपर्यंत नोंदणी करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी 'युवकांची लोकशाहीतील भूमिका व कर्तव्य' याबाबत मार्गदर्शन केले, तसेच नवमतदारांना मतदार नोंदणी करावी असे आवाहन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. व्ही. डी. सदाफळ तर आभार प्रा. डॉ. एस. एस. उघडे यांनी मानले. या कार्यक्रमात १०१ विद्यार्थी सहभागी होते.

ज्ञान संसाधन केंद्र

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आयोजित दि.१८ ऑक्टोंबर २०२४ रोजी अभ्यास भेट घेण्यात आली. सदर भेट ही अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील ज्ञान संसाधन केंद्र मंचर याठिकाणी घेण्यात आली.या वेळी ग्रंथालयाचे ग्रंथपाल मेमाणे सर यांनी यांनी विद्यार्थांशी संपर्क साधाल त्यावेळी त्यांनी सांगितले की ग्रंथालय हे एक असे ठिकाण आहे जेथे विविध प्रकाराची पुस्तके,

मासिके, वृत्तपत्रे, आणि इतर शैक्षणिक किंवा सांस्कृतिक सामग्री उपलब्ध असते. ग्रंथालयाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे ज्ञानाचा प्रसार करणे, वाचनाची प्रेरणा देणे, आणि विद्यार्थांना माहिती मिळवण्यासाठी ज्ञानसंसाधानाचे ठिकाण आहे. तसेच इंटरनेटचा वापर करून आपण विविध लेखकांची पुस्तके, कविता, लेख, संशोधन ग्रंथ कसे ऑनलाइन शोधू शकतो याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानसंशोधनाचे कामकाज कसे चालते याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आले.सदर क्षेत्र भेटीस ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

क्षेत्र भेट- दिवाणी फौजदारी न्यायालय घोडेगाव

रयत शिक्षण संस्थेचे अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाअंतर्गत दि.२३ ऑक्टोंबर २०२४ रोजी क्षेत्र भेट घेण्यात आली. सदर भेट ही दिवाणी व फौजदारी न्यायालय घोडेगाव ह्या ठिकाणी घेण्यात आली. अॅड.मुकुंद वळसे पाटील यांनी विद्यार्थांशी कायदेविषयक व न्यायालयीन प्रक्रियेसंदर्भात संवाद साधला.सदर क्षेत्र भेटीत मुद्दे माल कक्ष, अभिलेख कक्ष, सुनावणी कक्ष, ह्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. दिवाणी न्यायालयातील ज्येष्ठ वकिल अॅड.वळसे पाटील, अॅड.अमोल पोखरकर, वकील संघाच्या सचिव अॅड.प्रतीक्षा काळे, अॅड.नवनाथ निघोट अॅड. सागर गावडे , यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाजाचे प्रात्यक्षिक अनुभवता आले.सदर क्षेत्र भेटीस ३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

संविधान दिन

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग दि. २६ नोव्हेंबर२०२४ रोजी भारतीय संविधान दिन व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भारतीय संविधान दिवस 26 नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान स्वीकार करण्यात आले होता, जरी तो 26 जानेवारी 1950 पासून लागू झाला. संविधान दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश भारतीय संविधानाच्या

महत्वाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे आणि त्याच्या मूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. 2015 मध्ये भारत सरकारने संविधान दिनाला औपचारिक मान्यता दिली आणि त्यानंतरपासून हा दिवस साजरा केला जातो. याप्रसंगी प्रा. तानसेन रणदिवे यांनी, आधुनिक महाराष्ट्र आणि यशवंतराव चव्हाण यांचे विचार या विषयावर प्रकाश टाकला. यशवंत यशवंतरावांच्या पंचायत राज व्यवस्थेची निर्मिती , नादारीची सवलत व सहकारची बीजे त्यांनी पेरली यावर त्यांनी लक्ष वेधले. संविधानाचे आचरण तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे आचरण आपल्या जीवनात आणून लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी तरुणांनी पुढे येणे गरजेचे आहे असा मौलिक संदेश याप्रसंगी प्रा. तानसेन रणदिवे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. पारधी एस. एस. यांनी केले. उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन प्रा. पारधी एस. एस. यांनी केले .तर कार्यक्रमाचे आभार प्रा. मारुती कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाचेसूत्रसंचालन प्रा. सचिन रुपनर यांनी केले. याप्रसंगी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ.सालके सर उपस्थित होते. सदरकार्यक्रमास ३६ विद्यार्थी उपस्थित होते.

राष्ट्रीय मतदार दिन

राज्यशास्त्र विभाग आयोजित दि.२५/१/२०२५ रोजी राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम संपन्न झाला. या दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात निबंध स्पर्धा व व्याख्यान घेण्यात आले. प्रा. डॉ. संतोष पवार यांनी राष्ट्रीय दिनाचे महत्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये भारतीय निर्वाचन आयोगाची स्थापना, निर्वाचन आयोगाचे अधिकार व कार्य, महत्त्व या गोष्टींचा आढावा घेतला तसेच मताधिकार आणि आपले कर्तव्य याविषयी मार्गदर्शन करताना मतदारांनी लोकशाही मजबूत करण्यासाठी आपला मतदानाचा अधिकार निर्भीडपणे वापरला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर प्रा. डॉ.गणेश वाघ यांनी लोकशाहीतील मतदार याविषयावर मार्गदर्शन केले तर प्रा.डॉ.शेख इ. ए. यांनी मतदारानचे मानशास्त्र याविषयावर मनोगत व्यक्त केले. तसेच या दिनाचे औचित्य साधून निबंध स्पर्धेतील बक्षीस पात्र विध्यार्थ्यांना प्रमाणपत्र गुलाबपुष्प व भेट वस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम

क्षितिजा दिलीप मराडे द्वितीय कु. अश्विनी जीजाराम पेकारी तृतीय कु. रसिका संदीप जोशी उतेजनार्थ कु. सपना पोपट भांगरे व कु. संकेत शांताराम कारोटे. तसेच याप्रसंगी सामूहिक प्रतिज्ञा वाचन प्रा. पारधी एस.एस. यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. रणदिवे टी. वाय. यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार कु. निकिता मेचकर हिने मानले. सदर कार्यक्रमात ६५ विद्यार्थी सहभागी झाले.

ज्ञान संसाधन केंद्र अण्णासाहेब आवटे महाविद्यालयास भेट



दिवाणी फौजदारी न्यायालय घोडेगाव



नव युवा मतदार नोंदणी अभियानात बोलताना मा. सचिन वाघ (नायब तहसीलदार, आंबेगाव)


अण्णासाहेब आवटे महाविद्यालय,मंचर
GPS Map Camera
Manchar, Maharashtra, India
2X62+WWV, Ambegaon, Manchar, Maharashtra 410503, India
Lat 19.012945°
Long 73.95175°
02/08/24 10:40 AM GMT +05:30
Google